[Type text]

MMRC

## कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्ग
## जागतिक सायकल दिनानिमित्त एमएमआरसीतर्फे सायकल रॅलीचे आयोजन

**मुंबई, ३ जून २०१९:** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (मुं.मे.रे.कॉ) जागतिक सायकल दिनाच्या निमित्ताने मुंबईकरांना प्रदूषणमुक्त मुंबई असा संदेश देत विधानभवन मेट्रो स्थानक, मंत्रालयापासून ते आझाद मैदान येथे असलेले सीएसटी मेट्रो स्थानकापर्यंत सायकल रॅली आयोजित केली होती. इंधनांचा कमी वापर करत वाहतूक, सुरक्षितता आणि प्रदूषणमुक्त प्रवास हे या रॅलीचे मुख्य उद्दिष्ट होते. ही रॅली एमएमआरसीचे कार्यकारी संचालक श्री आर रमणा यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आली. मुं.मे.रे.कॉच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांनी रॅली मध्ये उस्फूर्तपणे सहभाग घेतला.

मेट्रो-३ च्या माध्यमातून प्रदूषणमुक्त, सुखकर व आरामदायी प्रवास करत येणे मुंबईकरांना शक्य होणार आहे. मुं.मे.रे.कॉतर्फे आयोजित केलेल्या सायकल रॅलीदरम्यान मुंबईकरांना प्रदूषणमुक्त प्रवासाचा देण्यात आला. आझाद मैदान येथे या रॅलीची सांगता करण्यात आली.